# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 21/09/2023 (गुरूवार) सकाळ

---

## पोलीस स्टेशन कुही हद्दीत रेती तस्करावर कुही पोलीसांची धडक कारवाई

पोस्टे कुही हद्दीतील २५ किमी अंतरावर मौजा उटी शिवार येथे रेतीची मोठ्या प्रमाणात अवैध्य वाहतूक होत असल्याची गोपनिय माहीती कुही पोलीसांना मिळाल्याने दिनांक २१/०९/२०२३ रोजी पोलीस स्टेशन कुही येथिल अधिकारी व स्टाफसह वरिष्ठांना माहीती देवून सदर मार्गावर जावून पेट्रोलींग केली असता मौजा उटी शिवार येथे १) ट्रक एमएच ४०—बीएल—४७१७ चालक आरोपी नामे— बादल शेखर शिवणकर ,वय २६ वर्ष रा. प्लाट नं.५९ संजय नगर हसनबाग नागपुर २) ट्रक एम. एच ४०/सी.डी.—९६६५ चालक आरोपी नामे— किशोर मोतिराम बुरबुरे ,वय २६ वर्ष रा. खडगाव रोड, सोनबा नगर नागपुर यांनी आपल्या ताब्यातील दोन्ही वाहनामध्ये अवैध्यरित्या विनापरवाना १४ ब्रास रेती किंमती ८४,०००/—रू. ची अवैध्य वाहतुक करून रेती चोरी करून नेतांनी मिळुन आल्याने आरोपीतांच्या ताब्यातून १) ट्रक एमएच ४०—बीएल—४७१७ किंमती २०,००००० व ट्रक एम. एच ४०—सी.डी.ल—९६६५ किंमती २०,००००००/—रू. असा एकुण दोन्ही वाहनासह ४०८४०००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त केला आहे.

सदरची कार्यवाही ही पोलीस अधिक्षक हर्ष पोद्दार सर भापोसे तसेच अपर पोलीस अधिक्षक डॉ. संदिप पखाले साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक महेश भोरटेकर, पोलीस उपनिरीक्षक हरीहर सोनकुसरे, सहायक फौजदार प्रमोद बन्सोड, संजय कानडे, पोलीस हवालदार चांगदेव कुथे, पोलीस अंमलदार दुर्गेश डहाके, आशिष खंडाईत, विकेश राउत, कार्तिक थेटे यांनी यशस्वीपणे पूर्ण केलेली आहे.

## जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद
## स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीणची कारवाई

दिनांक २१/०९/२०२३ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक पो.स्टे. रामटेक हद्दीत पेट्रोलिंग करीत असता गोपनीय माहिती मिळाली की, महेंद्रा बोलेरो पिकअप क्र. MH-27/BX 3396 या वाहनाने एक इसम अवैधरित्या गोवंश जातीच्या जनावरांची वाहतुक कत्तलीचे उद्देशाने करीत आहे. अशा खबरेवरून दिनांक २१/०९/२०२३ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने मौजा मनसर महामार्ग रोडवर नाकाबंदी लावुन वाहन चेक करीत असतांना महेंद्रा बोलेरो पिकअप क्र. MH-27/BX 3396 येतांना दिसली. त्या वाहन चालकास थांबण्याचा इशारा केला असता चालकाने आपले ताब्यातील वाहन नाकाबंदीच्या ठिकाणी न थांबवीता पळुन जात असतांना त्याचा स्टाफच्या मदतीने पाठलाग केला असता आरोपी बोलेरो चालक हा अंधाराचा फायदा घेऊन घटनास्थळावरून पळून गेला. महेंद्रा बोलेरो पिकअप गाडीची पाहणी केली असता बोलेरोमध्ये बेकायदेशीरपणे गोवंश यांना त्यांची चारा पाण्याची सोय न करता गाडी मध्ये कोंबून कत्तली करीता घेऊन जातांना दिसुन आले. घटनास्थळाहुन पांढरे रंगाच्या ४ गायी, लाल रंगाच्या ३ गायी व मरण पावलेल्या २ गायी (लाल व मळकट) किंमती १,६५,०००/— रू. असे गौवंशिय जनावरे, पिकअप वाहन क्र. MH 27 BX 3396 अंदाजे किंमती ७,००,०००/—रू ने वाहतुक करित असतांना मिळुन आल्याने व त्यापैकी २ गायी हया मृत अवस्थेत मिळुन आल्याने आरोपीविरूद्ध पोलिस स्टेशन रामटेक येथे कलम ११(१)(d) प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधिनियम, ४२९ भादवि, ८३, १७७ मोवाका, ५, १, २ महा.पशु संवर्धन अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करून पो.स्टे. रामटेक यांचे ताब्यात देण्यात आले.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. हर्ष पोद्दार (भा.पो.से.) तसेच अपर पोलीस अधीक्षक डॉ. श्री. संदीप पखाले साहेब यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक ओमप्रकाश कोकाटे, सहायक पोलीस निरीक्षक राजीव कर्मलवार, पोलीस हवालदार रोशन काळे, पोलीस नायक किशोर वानखेडे, उमेश फुलबेल, शंकर मडावी, नितेश पिपरोदे, विपीन गायधने, प्रमोद भोयर यांनी पार पाडली.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**